RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक १४(२)] गुरुवार, मार्च ३१, २०१६/चैत्र ११, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक १६**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.**— महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम .. .. .. .. | १-२ |


दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
सचिव,
महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग.

---

## सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९५९ चा ३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, २०१६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १०-१क ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १०-१क च्या विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :— १९५९ चा ३.

"परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांकरिता नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा ३१ डिसेंबर २०१७ किंवा त्यापूर्वीचा असेल, मात्र, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल, परंतु, जिला नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३०-१क ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३०-१क मध्ये विद्यमान परंतुकांऐवजी पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

" परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सरपंच पदाच्या निवडणुकीकरिता नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, २८ फेब्रुवारी २०१८ किंवा त्यापूर्वीचा असेल, मात्र, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल, परंतु, जिला नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सरपंच राहण्यास निरर्ह ठरेल.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक २०(२)] गुरुवार, मार्च ३१, २०१६/चैत्र ११, शके १९३८ [ पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक २८

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Village Panchayats (Amendment) Act, 2016 (Mah. Act No. X of 2016), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAKASH H. MALI,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. X OF 2016.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 31st March 2016).*

An Act further to amend the Maharashtra Village Panchayats Act, 1958.

III of 1959. WHEREAS, it is expedient further to amend the Maharashtra Village Panchayats Act, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Sixty-seventh Year of the Republic of India as follows :—

**1.** This Act may be called the Maharashtra Village Panchayats (Amendment) Act, 2016. Short title.

Amendment of section 10-1A of III of 1959.

**2.** In section 10-1A of the Maharashtra Village Panchayats Act (hereinafter referred to as "the principal Act"), for the existing provisos, the following provisos shall be substituted, namely :— III of 1959.

"Provided that, for the General or by-elections for which the last date of filing of nomination falls on or before the 31st December 2017, in accordance with the election programme declared by the State Election Commission, a person who has applied to the Scrutiny Committee for verification of his Caste Certificate before the date of filing of the nomination papers but who has not received the Validity Certificate on the date of filing of the nomination papers shall submit, alongwith the nomination papers,—

*(i)* a true copy of the application preferred by him to the Scrutiny Committee for issuance of the Validity Certificate or any other proof of having made such application to the Scrutiny Committee; and

*(ii)* an undertaking that he shall submit, within a period of six months from the date on which he is declared elected, the Validity Certificate issued by the Scrutiny Committee:

Provided further that, if the person fails to produce the Validity Certificate within a period of six months from the date on which he is declared elected, his election shall be deemed to have been terminated retrospectively and he shall be disqualified for being a member.".

Amendment of section 30-1A of III of 1959.

**3.** In section 30-1A of the principal Act, for the existing provisos, the following provisos shall be substituted, namely :—

"Provided that, for the elections for the post of *Sarpanch* for which the last date of filing of nomination falls on or before the 28th February 2018, in accordance with the election programme declared by the State Election Commission, a person who has applied to the Scrutiny Committee for verification of his Caste Certificate before the date of filing of the nomination papers but who has not received the Validity Certificate on the date of filing of the nomination papers shall submit, alongwith the nomination papers,—

*(i)* a true copy of the application preferred by him to the Scrutiny Committee for issuance of the Validity Certificate or any other proof of having made such application to the Scrutiny Committee; and

*(ii)* an undertaking, that he shall submit, within a period of six months from the date on which he is declared elected, the Validity Certificate issued by the Scrutiny Committee:

Provided further that, if the person fails to produce the Validity Certificate within a period of six months from the date on which he is declared elected, his election shall be deemed to have been terminated retrospectively and he shall be disqualified for being a *Sarpanch*.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.